महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा लेखा अधिकारी (गट-ब) संवर्गातील अधिकाऱ्यांना सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) पदावर तात्पुरती पदोन्नती व पदस्थापना.

महाराष्ट्र शासन
वित्त विभाग,
शासन आदेश, क्रमांक :-संलेको २०२३/प्र.क्र.२०१/कोषा. प्रशा.२
मादाम कामा रोड, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२
दिनांक :- १५/०३/२०२४.

**शासन आदेश**

महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, लेखा अधिकारी गट-ब (राजपत्रित) संवर्गातील खालील विवरणपत्रात नमूद अधिकाऱ्यांना महाराष्ट्र वित्त व लेखा सेवा, सहायक संचालक गट-अ (कनिष्ठ) संवर्गात (एस-२०) (५६,१००-१,७७,५००) या वेतनबॅण्डमध्ये पदाचा कार्यभार स्विकारतील त्या दिनांकापासून खालील अटींच्या अधिन राहून तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत असून, पदोन्नत अधिकाऱ्यांना महसूल वाटप अधिनियम दिनांक १४.०७.२०२१ मधील तरतूदीनुसार स्तंभ क्र.३ मध्ये दर्शविलेल्या महसूल विभाग वाटपानुसार स्तंभ क्र.४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने पदस्थापना देण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिकाऱ्यांचे नाव | वाटप करण्यात आलेला महसूल विभाग | तात्पुरत्या पदोन्नतीची पदस्थापना |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री.राहुल जगदाळे | कोकण-१ | सहायक संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा, पालघर |

२ (अ) मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुज्ञा याचिका क्र.२८३०६/२०१७ च्या अधिन राहून पदोन्नतीच्या कोट्यातील सर्व रिक्त पदे दि.२५.०५.२००४ स्थित सेवाज्येष्ठतेनुसार, निव्वळ तात्पुरत्या स्वरुपात भरण्याबाबत सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दिनांक ०७.०५.२०२१ अन्वये दिलेल्या सुचनांनूसार तसेच सामान्य प्रशासन विभाग, दिनांक ०७.०५.२०२१ च्या शासन निर्णयाप्रकरणी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे आव्हान देण्यात आलेले असून त्यावरील अंतिम निर्णयाच्या अधिन उपरोक्त विवरणपत्रातील अधिकाऱ्यांना तात्पूरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यात येत आहे.

(ब) सदर पदोन्नती निव्वळ तात्पुरत्या स्वरुपाची असल्याने या तात्पुरत्या पदोन्नतीच्या परिणामी निवडसूचीतील अधिकाऱ्यांना नियमितपणाचा व सेवाज्येष्ठतेचा कोणताही हक्क राहणार नाही.

(क) सदरचे पद हे महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कार्यकक्षेतील असल्यामुळे सदर पदोन्नती/ निवडसुची लोकसेवा आयोगाच्या मान्यतेने नियमित करण्यात येईल.

३.	वरील अधिकाऱ्यांनी आपल्या पदोन्नत पदाचा कार्यभार या आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत त्वरीत स्वीकारावा व तसे केल्याबद्दल कार्यभार हस्तांतरण प्रमाणपत्र या विभागाकडे पाठवावे. विहित कालावधीत नियूक्ती न स्विकारल्यास पदोन्नतीचे आदेश रद्द करण्यात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

(ता .र .पवार)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत,

१) महालेखापाल १/२ (लेखा व अनुज्ञेयता)/(लेखा परीक्षा), महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर*.
२) अप्पर मुख्य सचिव, सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई.
३) संचालक, लेखा व कोषागारे संचालनालय, मुंबई.
४) संचालक, स्थानिक निधी लेखा परीक्षा संचालनालय, कोकण भवन, नवी मुंबई *
५) मा.उपमुख्यमंत्री तथा मंत्री (वित्त) यांचे सह सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) सहसंचालक लेखा व कोषागारे, पुणे*
७) सह संचालक, स्थानिक निधी लेखापरीक्षा (कोकण विभाग),नवी मुंबई*.
८) श्री.राहुल जगदाळे, लेखाअधिकारी (भांडार पडताळणी), सहसंचालक लेखा व कोषागारे, पुणे*
९) सचिव (ले .व को.) यांचे स्वीय सहाय्यक, मंत्रालय, मुंबई.
१०) कक्ष अधिकारी, कोषा.प्रशा.१, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
११) निवड नस्ती कोषा.प्रशा.२, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.

*(संचालक, लेखा व कोषागारे, मुंबई यांचेमार्फत)